१७


# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१
पीबीएक्स- ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४ फॅक्स- ०२०-२६१२७००४/२६१३२४०१
Email :- dirmktms@gmail.com website :- www.mahapanan.maharashtra.gov.in


जा.क्र.पणन-५/कृउबास/प्रशासक/मानधन/३५७५/२० दिनांक :- २६ ऑक्टोबर, २०२०

वाचावे :-
१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १५-अ(४) मधील तरतूदी.
२) या कार्यालयाचे प्रशासक मानधनाबाबतचे इंग्रजी आदेश क्र.जीएमआर/ॲक्ट ॲन्ड रुल्स, दि.२०.०३.१९८४
३) या कार्यालयाचे प्रशासक माधनाबाबतचे इंग्रजी आदेश क्र.सीएमबी/ ॲक्ट ॲन्ड रुल्स, दि.३१.१०.१९८४
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र सम दि.२२.०७.२०१३
५) या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. पणन-५/कृउबास/प्रशासन मानधन/२०१३, दि.०४.०१.२०१४

**विषय :- कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आस्थापनेवरील प्रशासक या पदावर काम पाहणारे सहकार खात्यातील अधिकारी यांना मानधन देणेबाबत...**

**-: आदेश :-**

कृषि उत्पन्न बाजार समितीवरील प्रशासक मानधनाबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र.५ मध्ये या कार्यालयाचे प्रशासक मानधनाबाबतचे इंग्रजी आदेश क्रमांक जीएमआर/ ॲक्ट ॲन्ड रुल्स, दि.२०.०३.१९८४ व इंग्रजी आदेश क्रमांक सीएमबी/ ॲक्ट ॲन्ड रुल्स, दि.३१.१०.१९८४ चे आदेशानुसार देय होणारे मानधन कमाल मर्यादा रू.१५,०००/- इतके अदा करण्यास मंजूरी देण्यात आली होती. मात्र या आदेशामध्ये बदल करून महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम १५-अ(४) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी सतिश सोनी, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

२. कृषि उत्पन्न बाजार समितीवर प्रशासक म्हणून काम करणाऱ्या प्रशासकांना बाजार समितीच्या मागील आर्थिक वर्षाच्या एकूण उत्पनाच्या आधारावर खालीलप्रमाणे वर्गवारी निश्चित करण्यात येत असून या वर्गवारीनुसार विहित केलेले मानधन देण्यात यावे.

| अ.क्र. | बाजार समितीचे मागील वर्षातील वार्षिक उत्पन्न | प्रशासकांचे मानधन (मुळ वेतनाच्या प्रतिमाह) |
|---|---|---|
| १ | रू.२५ कोटी च्या वर | ४०% |
| २ | रू. १० कोटीपेक्षा जास्त ते २५ कोटी पर्यंत | ३०% |
| ३ | रू.५ कोटीपेक्षा जास्त ते १५ कोटीपर्यंत | २५% |
| ४ | रू. १ कोटीपेक्षा जास्त ते ५ कोटी पर्यंत | २०% |
| ५ | रू. १ कोटीपेक्षा कमी | १०% |

३. सदर मानधन देतांना खालील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

***अटी व शर्ती :-***

१. तोट्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीकडून मानधन देय नाही.
२. उपरोक्त नमूद मानधन रक्कमेच्या मर्यादेमध्ये बाजार समितीचे प्रशासक यांना मानधन निश्चित करतांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे फक्त मुळ वेतनाचा समावेश असेल.



Scanned by CamScanner

३. प्रशासक उपरोक्त नमूद मानधनाखेरीज इतर कोणत्याही स्वरूपाचे भत्ते व तत्सम स्वरूपाची रक्कम देणे बाजार समितीस अनुज्ञेय राहणार नाही.

४. प्रशासकाचे मानधन निश्चित करण्यापूर्वी त्यास जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. तथापि, बाजार समितीवर जिल्हा उपनिबंधक अथवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नेमणूक झाली असल्यास पणन संचालकाची मान्यता घेण्यात यावी.

५. प्रशासकांनी या आदेशाचा दिनांकापूर्वी मानधन घेतले असल्यास त्याबाबतीत हा आदेश पूर्वलक्षीप्रभावाने लागू असणार नाही.

सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी उपरोक्त सूचना आपल्या विभागातील/जिल्ह्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे निदर्शनास आणून द्याव्यात आणि सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल असे पहावे.

(सतिश सोनी)
**पणन संचालक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

**प्रत माहितीसाठी सविनय रवाना :-**

१. मा. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२.
२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :-**

१. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३७.
२. सभापती/ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, (सर्व)



Scanned by CamScanner